**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – सुशांत विष्णू पुरळकर
वय – ४७ वर्षे.
व्यवसाय – पोहेकॉ ४३१
रा/ने – विजयदुर्ग पोलीस ठाणे, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. ३०/०९/२०२३ रोजी माझे नेमणुक आचरा पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून होती. सदर दिवशी आचरा पोलीस ठाणे गुन्हा क्र. ४४/२०२३ चे तपासकाम माझ्याकडे सोपविण्यात आले होते. सदर गुन्हा हा अपघाताचा होता. तपासकामी मी घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीचे तसेच जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. आरोपीला सीआरपीसी कलम ४१ (१) प्रमाणे नोटीस दिली. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीस दाखविल्यास मी ओळखू शकतो.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. यु.बी.कुळकर्णी यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचाच्या सहया मी पोलीस स्टेशन येथे घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने घटनास्थळ दाखवले नाही व घटनास्थळाची पंचानी पाहणी केलेली नाही. पंचनाम्यामध्ये अपघात रस्त्यावर झाला असे नमूद केलेले आहे. पंचनाम्यामध्ये रस्त्याचे वर्णन चिंदर ते बुधवळे असा जाणारा रस्ता असा उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, चिंदर ते बुधवळे हा सहा किलोमिटरचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये चिंदर ते बुधवळे या रस्त्यावर नेमक्या कोणत्या ठिकाणी म्हणजेच कोणत्या हद्दीच्या दगडाजवळ अपघात झाला असे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे

की, रस्त्यावर किलोमिटरच्या खुणा असतात. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये नेमका बुधवळे पासून किती किलोमिटरच्या अंतरावर तसेच चिंदर पासून किती किलोमिटरच्या अंतरावर कथीत घटनास्थळ आहे हे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावरुन नेमके अपघाताचे ठिकाण कोठे आहे हा बोध होत नाही.

३. मी घटनास्थळी पंचाना बोलवून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचाना कोठून बोलविले याबद्दलचा उल्लेख पंचनाम्यामध्ये नाही. मी पंचनाम्यामध्ये पोल रस्त्यापासून किती अंतरावर आहे ते अंतर नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामध्ये अपघातातील मोटरसायकल क्र. एमएच–०४–जीएल–५५७२ ही कोणत्या दिशेला तोंड करुन होती हे नमूद नाही. पंचनाम्यामध्ये सदर मोटरसायकल पुर्व दिशेला तोंड करुन होती. पंचनाम्यामध्ये मोटरसायकलचा चेसीस नंबर, इंजिन नंबर नमूद केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अपघातातील मोटरसायकल एमएच–०४–जीएल–५५७२ हीच होती हे दाखविण्यासाठी इंजिन नंबर व चेसिस नंबर गरजेचे होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोटरसायकलवर विशिष्ठ खुणा काय होत्या हे देखील पंचनाम्यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघातातील दुसऱ्या गाडीचा चेसिस नंबर व इंजिन नंबर नमूद नाही.हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामध्ये सदर मोटरसायकल पुर्वेस तोंड करुन होती हे चुकीचे लिहिलेले आहे. पंचनाम्यामध्ये रोडच्या कडेला असलेल्या लाईट पोलचा नंबर पंचनाम्यामध्ये नमूद केलेला नाही. सदर पोलचा नंबर पंचनाम्यामध्ये नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदानंद पेडणेकर यांची जमिन असा उल्लेख करत असताना त्याबद्दलचा ७/१२ उतारा हजर केलेला नाही तसेच मिळकतीचे वर्णन नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामध्ये चेसीस नंबर, इंजिन नंबर व पोलचा क्रमांक नमूद नसल्याकारणाने सदर पंचनामा घटनास्थळी न करता पोलीस स्टेशन येथे करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्याही साक्षीदाराचे तपास टिप्पण नोंदविलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांच्या तपासामध्ये आरोपीच्या

चुकीमुळे अपघात घडला असे काहीही निष्पन्न झालेले नसताना आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या चुकीमुळे त्याचा मोटरसायकल नियंत्रित न झाल्यामुळे त्याने आरोपीच्या गाडीला विरुध्द बाजूला जावून ठोकर मारल्याने अपघात झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघात फिर्यादीच्या चुकीमुळे झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या चुकीमुळे सदरचा अपघात घडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ०५-०४-२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.